# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची संक्षिप्त माहिती

**उदिष्ट** :- उमेदवारांना उद्योजकांकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करणे.

**आर्थिक तरतुद :-**

- “मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरीता रु.५५०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे .

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूप:-**

- उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**अंमलबजावणी संस्था :-** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.

**योजनेचे ठळक वैशिष्टे :-**

- बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करू शकतील.
- विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प,उद्योग/स्टार्टअप्स, विविध आस्थापना इ.यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदवतील.
- सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणाच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील.
- सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.
- सदर विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात (DBT) जमा करण्यात येईल.

**आस्थापना/उद्योजकासाठी पात्रता**

- आस्थापना / उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.
- आस्थापना / उद्योजकाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.
- आस्थापना / उद्योगाची स्थापना किमान ३ वर्ष पूर्वीची असावी.
- आस्थापना / उद्योगांनी EPF, ESIC, GST, Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधारची नोंदणी केलेली असावी.

**उमेदवारांची पात्रता:**

- उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.
- उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२वी पास/आयटीआय/पदविका/पदवीधर/पदव्युत्तर असावी.
- उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.
- उमेदवाराचे आधार नोंदणी असावी.
- उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
- उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

**शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विद्यावेतनाचे विवरण खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन रु. |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | रु. ६,०००/- |
| २. | आय.टी.आय/ पदविका | रु. ८,०००/- |
| ३. | पदवीधर /पदव्युत्तर | रु. १०,०००/- |

**संपर्क** - अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अथवा हेल्पलाईन क्रमांक- १८०० १२० ८०४० वर संपर्क साधावा.

संलग्नक — कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासनाव्दारे दि. ०९.०७.२०२४ रोजी जारी केलेल शासन निर्णय (संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३)

**सद्यस्थिती -**

- **मा. मंत्री**, कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.०७.२०२४ रोजी आयुक्तालयाच्या अधिनस्त सर्व विभागीय आयुक्त, सर्व सहायक आयुक्त व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या अधिनस्त सर्व सह संचालक, सर्व उपसंचालक, सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आणि राज्यातील सर्व आयटीआयचे प्राचार्य यांचेसोबत Video Conference घेण्यात आली व यामध्ये CMYKPY योजना, योजनेचा उद्देश, कार्यपध्दती इ. बाबतची माहिती देण्यात आली आणि या योजनेच्या अंतर्गत उद्योजकांना त्यांचेकडील रिक्त पदे अधिसुचित करुन घेणेसंदर्भात सुचना देण्यात आल्या.
- **मा. मुख्य सचिव** यांचे अध्यक्षतेखाली दि.१०.०७.२०२४ रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांचेसोबत Video Conference घेण्यात आली व यामध्ये CMYKPY योजनेची माहिती, योजनेचा उद्देश, कार्यपध्दती इ. बाबतची माहिती देण्यात आली व सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अपेक्षित सहभाग देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या.
- Call center च्या प्रतिनिधींना या योजनेबाबत माहिती तसेच उद्योजक, उमेदवार व इतर सहभागधारक यांच्याकडून विचारण्यात येणाऱ्या संभाव्य प्रश्नाची उत्तरे अवगत करुन देण्यासाठी आयुक्तालयामार्फत FAQs बनवून देण्यात आले आहेत. आणि त्याबाबतचे प्रशिक्षण दि.१२.०७.२०२४ रोजी आयोजित केले होते.
- इंडस्ट्री मिटअंतर्गत ११७५ उद्योजकांसमवेत सामंजस्य करार करण्यांत आले होते त्या उद्योजकांना व आचार्य चाणक्य कौशल्य केंद्र या योजनेशी संलग्न असणाऱ्या महाराष्ट्रातील ६२४ महाविद्यालयांना या योजनेची माहिती ई-मेल व्दारे कळविण्यात आलेली असून सदर योजनेअंतर्गत सामंजस्य करार करणेबाबत आवाहन केले आहे.
- विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या सुमारे दीड लाख उद्योजकांना सदर योजनेची माहिती अवगत करुन योजनेत सहभागी होणेबाबत आवाहन करण्यात आले आहे व त्याविषयी कॉल सेंटर तसेच जिल्हास्तरीय अधिका-यामार्फत पाठपुरावा करण्यांत येत आहे.
- या योजनेचा लाभ घेण्याकरिता उमेदवार व उद्योजक यांना महास्वयंम पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु सदर लिंक सद्यस्थितीत under testing असुन दोन दिवसात कार्यान्वित करण्यात येईल.